जा.क्र. पोआ/४३२७ /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक :- ३१.०७.२०२०

विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक ०१.०८.२०२० चे ००:०१ ते दिनांक १५.०८.२०२० चे २४:०० वा.च्या दरम्यानचा जमावबंदीचा आदेश. (पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंन्टेन्मेन्ट झोन वगळून उर्वरीत क्षेत्रासाठी)

आदेश –

२. ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २९.०७.२०२० अन्वये कोव्हिड- १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि. ३१.०८.२०२० अखेर वाढविलेली आहे आणि कोव्हिड - १९ चे प्रतिबंधासाठी राज्यात वाढवलेल्या लॉकडाऊनच्या मुदतीसाठी सुधारित मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत.

३. भारत सरकार आरोग्य मंत्रालय, तसेच महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, अशा मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. तसेच **सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे किंवा चर्चा करणे,** तसेच कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणुंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस व आस्थापना यांना उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४. त्याअर्थी मी **संदीप विष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिचंवड,** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील घोषित कंन्टेन्मेन्ट झोन्स व्यतिरिक्त उर्वरीत क्षेत्रासाठी फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ०१.०८.२०२० चे ००:०१ ते दिनांक १५.०८.२०२० चे २४:०० वा. पर्यंत जमावबंदीचा आदेश लागु करीत आहे.**

५. **संपुर्ण राज्यात खालील बाबींना मनाई असेल -**

i) शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था, बंद राहतील. परंतु ऑनलाईन शिक्षण /दुरस्थ शिक्षण यांना परवानगी राहील तसेच त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

ii) सर्व सिनेमागृहे, जलतरण तलाव, करमणुक केंद्रे, उदयाने, नाटयगृहे, बार आणि सभागृहे, असेंब्ली हॉल आणि तत्सम ठिकाणे बंद राहतील.

iii) केंद्रीय गृहविभागाने परवानगी दिलेल्या आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुक वगळता इतर आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुकीस मनाई राहील.

iv) मेट्रो रेल्वे सेवा बंद राहतील.

v) सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे यांना आणि मोठया संख्येने एकत्र जमण्यास बंदी राहील.

vi) सर्व धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे नागरीकांसाठी बंद राहतील.

Scanned with CamScanner

६. **कोव्हीड १९ व्यवस्थापनाच्या अनुषंगाने राष्ट्रीय निर्देश :-**

**अ) सार्वजनिक ठिकाणाकरीता निर्देश –**

१. **तोंडावर मास्क परिधान करणे** - सर्व सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी आणि वाहतुकी दरम्यान नागरीकांनी तोंडावर मास्क परिधान करणे बंधनकारक आहे.

२. **सामाजिक अंतर** - सर्व सार्वजनिक ठिकाणी प्रत्येक नागरीकाने किमान ६ फुट अंतर (२ गज की दुरी) सामाजिक अंतर राखणे अनिवार्य आहे. दुकानदार हे दुकानांमध्ये खरेदीसाठी येणा-या ग्राहकांमध्ये शारिरीक अंतर पाळले जाईल याची खात्री करतील आणि एका वेळी ५ पेक्षा जास्त ग्राहकांना परवानगी देणार नाहीत.

३. **मेळावे / सार्वजनिक कार्यक्रम** - मोठे सार्वजनिक मेळावे / कार्यक्रम तसेच मोठया संख्येने लोकांना एकत्र येण्यास मनाई राहील. **लग्न सोहळयासारख्या कार्यक्रमांना ५० पेक्षा जास्त लोकांना परवानगी नाही.**

**अंत्यविधी / अंतिम संस्कार सारख्या कार्यास २० पेक्षा जास्त लोकांना परवानगी नाही -**

४. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हे दंडनिय असेल. त्यानुसार सक्षम प्राधिकारी हे कायदयातील अधिनियमातील तरतुदीनुसार किंवा नियमानुसार नियमन व कार्यवाही करतील.

५. सार्वजनिक ठिकाणी मदय, पान, तंबाखु इत्यादी खाण्यास सक्त मनाई आहे.

**ब) कार्यालयीन ठिकाणाकरीता अतिरिक्त निर्देश –**

६. **घरातुन काम करणे (WFH)** - जास्तीत जास्त शक्य तो घरातुन काम करण्याच्या कार्यपध्दतीचा वापर करावा. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, मार्केट्स आणि औदयोगीक व वाणिज्य आस्थापना या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाचा तासाप्रमाणे आळीपाळीने वाटपाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

७. **स्क्रिनिंग आणि स्वच्छता** - कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर येण्याच्या व जाण्याच्या ठिकाणी आणि सर्व सामान्य क्षेत्रात थर्मल स्कॅनिंग, हॅन्डवॉश व सॅनिटायझरची उपलब्धता करावी.

८. **वारंवार सॅनिटायझेशन** - कामाच्या ठिकाणाचे तसेच तेथील सामान्य सुविधांचे व लोकांच्या सतत संपर्कात येणा-या बाबींचे वेळोवेळी तसेच शिफ्टस् दरम्यान संपुर्ण सॅनिटायझेशन करावे. उदा. दरवाजाचे हॅन्डल्स

९. **सामाजिक अंतर** - सर्व कामाच्या ठिकाणांचे प्रभारी यांनी कामाच्या ठिकाणी सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी. कामगारांच्या व कर्मचा-यांच्या कामाच्या शिफ्टस् आणि भोजनाचे वेळा टप्याटप्याने ठेवाव्यात.

**७) विशेष प्रकरणांमध्ये व्यक्ति व वस्तु/मालाची हालचाल सुनिश्चित करण्यासाठी विशेष निर्देश -**

i) आंतरराज्य व राज्यांतर्गत सर्व वैदयकीय व्यावसायीक, परिचारीका, वैदयकीय कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, रुग्णवाहीका यांना कोणत्याही प्रकारच्या निर्बंधाशिवाय परवानगी राहील.

ii) व्यक्तींच्या आंतरराज्य व आंतरजिल्हा हालचाली चालु राहतील. मजुर, स्थलांतरीत कामगार, यात्री, पर्यटक इत्यादींच्या हालचाली दि.२९.०४.२०२० व दि.०१.०५.२०२० रोजीच्या आदेशातील प्रमाणित कार्यपद्धती नुसार चालु राहतील.

iii) सर्व प्रकारच्या वस्तु/ मालाची आंतरराज्य वाहतुक तसेच रिकामी मालवाहु वाहने यांना परवानगी राहील.

**८) असुरक्षित व्यक्तींच्या संरक्षणाबाबत :-**

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती, गरोदर महिला आणि दहा वर्षाखालील मुले यांनी अत्यावश्यक आणि वैदयकीय कारण वगळता घरातच थांबणे आवश्यक आहे.

**९) आरोग्य सेतुच्या वापराबाबत :-**

१.आरोग्य सेतु ॲप हे कोरोना संसर्गाच्या संभाव्य जोखमीची अगोदर ओळख करण्यास मदत करते. आणि ते व्यक्तींस आणि समाजास ढाल म्हणुन मदत करते.

२.कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवण्याच्या दृष्टीने अनुरुप मोबाईल फोन असलेल्या सर्व कर्मचा-यांनी आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.

३.नागरीकांनी त्यांच्या मोबाईल फोनवर आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्यांची आरोग्य विषयक दैनंदिन माहिती अदययावत करावी.

Scanned with CamScanner

१०) **खालील सर्व बाबींना अटीच्या अधिन राहुन परवानगी आहे -**

या आदेशाच्या अनुच्छेद ५ मध्ये समाविष्ट बाबी वगळता तसेच स्पष्टपणे प्रतिबंधीत बाबी वगळता किंवा बंदी घातलेल्या बाबी वगळता खालील बाबींना अटींच्या अधिन राहून परवानगी आहे.

i) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हददीतील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील **सर्व अत्यावश्यक बाबींची दुकाने मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापण प्राधिकरण, पुणे व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी विनिर्दिष्ट केलेप्रमाणे पी - १, पी – २ पध्दतीने सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०७.०० वा. या कालावधीत सुरु राहतील.** पी - १, पी – २ तत्वानुसार रस्त्याच्या एका बाजुची दुकाने सम तारखेस उघडी राहतील. व दुस-या बाजुची दुकाने विषम तारखेस उघडी राहतील. दुकानामध्ये वस्तु खरेदीसाठी गर्दी होवू नये व सुरक्षीत अंतर रहावे म्हणुन नागरिकांना उभे राहण्याच्या जागेवर ६ फुट अंतराच्या खुणा करून ठेवाव्यात. व सामाजिक अंतर पाळले जाईल याची दक्षता घ्यावी.

ii) **जिल्हांतर्गत बस सेवा आसन क्षमतेच्या कमाल ५०% क्षमतेनुसार चालविण्यास परवानगी राहील** तथापि बस मध्ये योग्य शारिरीक अंतराच्या नियमाचे पालन करणे आणि बसचे निर्जतुकीकरण करणे आवश्यक राहील.

iii) **आंतरजिल्हा हालचाली पुर्वीप्रमाणे नियंत्रीत राहतील.**

iv) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हददीतील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील **सर्व अत्यावश्यक नसलेल्या बाबींची दुकाने / मार्केट हे मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापण प्राधिकरण, पुणे व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी विनिर्दिष्ट केलेप्रमाणे सकाळी ०९.०० वा.ते सायंकाळी ०७.०० वा.पर्यंत चालु राहतील.**

v) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हददीतील कंटेनमेंन्ट झोन बाहेरील **मॉल व मार्केट कॉम्प्लेक्स हे दिनांक ०५.०८.२०२० पासुन सकाळी ०९.०० वा.ते सायंकाळी ०७.०० वा.पर्यंत चालु राहतील.** परंतु मॉल्स व मार्केट कॉम्प्लेक्स मधील थिएटर्स, फुड कोर्ट्स /रेस्टॉरंन्टस् बंद राहतील तथापी फुड कोर्ट्स /रेस्टॉरंन्टस् यांना ॲग्रीगेटर्स मार्फत होम डिलव्हरी देण्यासाठी संबंधीत प्राधिकरणाने (शहरी / ग्रामीण) निर्गमीत केलेल्या प्रमाणीत कार्यपध्दतीनुसार परवानंगी राहील.

vi) हॉटेल लॉजिंग गेस्ट हाऊस मधील निवास व्यवस्था सेवा ३३ टक्केच्या मर्यादेत सुरु राहील. मात्र ज्या हॉटेलमध्ये संस्थात्मक विलगीकरण/ अलगीकरण केले जात असेल तेथे निवास व्यवस्था १०० टक्के पर्यंत करणे अनुज्ञेय राहील. हॉटेल किंवा लॉजिंग मधील रेस्टॉरंट/ कॅन्टींनची सोय केवळ तेथे निवासी राहणा-या प्रवाशांसाठी सुरु राहील.

vii) **लग्नसमारंभास खुले लॉन, विनावातानुकुलीत मंगल कार्यालय/हॉल/सभागृह तसेच घर व घराचे परिसरात मर्यादीत ५० लोकांच्या उपस्थितीत व सामाजीक अंतर पाळून, दिनांक २३.०६.२०२० रोजीचे आदेशाप्रमाणे** कोव्हीड-१९ चे संदर्भात निर्गमीत केलेल्या सुचनांचे पालन करण्याचे अटीवर पार पाडण्यास परवानगी राहील.

viii) सर्व बाहेरील शारिरीक व्यायाम व इतर हालचाली योग्य शारिरीक सामाजिक अंतराचे नियम पाळुन करता येतील. क्रिडा संकुले, स्टेडीयम यांचे बाहय भाग व खुली सार्वजनिक ठिकाणे, महापालिकेची मैदाने व उद्याने, संस्था/सोसायटीची मैदाने व उद्याने नागरीकांसाठी खुली राहतील. तथापी अशा ठिकाणी फक्त वैयक्तीकरित्या करावयाचे व्यायाम प्रकार, एकटयाने खेळावयाचे खेळ उदा.सायकल, जॉगींग, धावणे, चालणे, योगासने, दोरीवरच्या उडया इत्यादींना मुभा राहील. तसेच असांघीक खेळ जसेकी गोल्फ कोर्सेस, बाहय फायरींग रेंज, जिमनॅस्टिक्स, टेनिस, बाहय बॅडमिंटन आणि मल्ल खांब यांना दिनांक ०५.०८.२०२० पासुन कोव्हीड-१९ चे संदर्भात निर्गमीत केलेल्या सुचनांचे पालन करुन परवानगी राहील. प्रेक्षक व सामुहीक उपक्रम, सांघीक खेळ, खेळाचे साहित्य, एकापेक्षा जास्त खेळाडूंनी हाताळण्याची शक्यता असलेले सर्व खेळ उदा. क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, कबड्डी, खो.खो. हॉकी इ. यांना परवानगी असणार नाही. अशा ठिकाणी सामाजीक/शाररीक अंतर ठेवणे बंधनकारक असेल. सदर परवानगी सकाळी ०६/०० ते सायंकाळी ०७/०० वा. पर्यंत असेल. इनडोअर

Scanned with CamScanner

स्टेडीयम किंवा स्टेडीयमच्या आतील परिसरात कोणताही उपक्रम/कार्यक्रम/खेळ यांना परवानगी असणार नाही.

ix) वृत्तपत्रे व नियतकालिकांच्या प्रिंटींग व घरपोच डीलीव्हरीस परवानगी राहील.

x) शैक्षणीक संस्था (विदयापीठे/ महाविद्यालये/ शाळा) यांची कार्यालये / आस्थापना यांना अध्यापनाव्यतिरिक्त कामासाठी, इ-सामग्री विकसीत करण्यासाठी, उत्तरपत्रिकांच्या मुल्यांकनाकरीता आणि निकाल जाहीर करणेकरीता परवानगी राहतील.

xi) केश कर्तनालय,स्पा,सलुन व ब्युटी पार्लर यांना दिनांक २५.०६.२०२० रोजीचे राज्य शासनाचे आदेशाप्रमाणे कोव्हीड-१९ चे संदर्भात निर्गमीत केलेल्या सुचनांचे पालन करण्याचे अटीवर सुरु ठेवण्यास परवानगी राहील.

xii) सर्व सार्वजनिक व खाजगी प्रवासी वाहतुक खालील प्रमाणे चालु राहील.

| | |
|---|---|
| दुचाकी | १ चालक व १ प्रवासी (हेल्मेट व मास्कसह) |
| तीन चाकी | १ चालक व २ प्रवासी (फक्त अत्यावश्यक बाबींकरीता) |
| चार चाकी | १ चालक व ३ प्रवासी (फक्त अत्यावश्यक बाबींकरीता) |

वाहतुकीदरम्यान मास्क परिधान करणे बंधनकारक राहील.

Xiii) नागरीकांनी अत्यावश्यक बाबी व्यतिरिक्त खरेदी, शारिरीक व्यायाम व इतर हालचाली करतेवेळी जवळील ठिकाणांचा वापर करणे तसेच मास्क परिधान करणे, वैयक्तिक स्वच्छता व सामाजिक अंतर पाळणे बंधनकारक आहे. अमर्यादीत हालचाली हे फक्त आपल्या कामाच्या ठिकाणी उपस्थित राहण्याकरीता राहील.

Xiv) राज्य शासन / जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे / आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडून सरकारी व खाजगी कार्यालये (आयटी/ आयटीईएस कंपन्यासह), उद्योग, बांधकाम प्रकल्प, मद्यविक्री, ई कॉमर्स, कृषी व भाजी-फळे मंडई यांना वेळोवेळी अटी व शर्तीसह देण्यात आलेले आदेश व परवानग्या यापुढेही चालु राहतील.

**Xv) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचेकडील परिपत्रक क्रं.आरएलपी- ०६२०/प्र.क्रं.९०/वि.शा.१ व, दिनांक ११.०७.२०२० अन्वये सार्वजनिक गणेशोत्सव – २०२० अनुषंगाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कौविड-१९ याविषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैदयकीय, शिक्षण विभाग तसेच संबंधीत महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सुचना प्रसिध्द झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.**

**Xvi) बकरी ईद-२०२० च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रं.०६ /२०२०/ प्र.क्रं.९१/ वि.शा.१, दिनांक १७.०७.२०२० मधील दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.**

**Xvii) १५ ऑगस्ट – २०२० रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करणेबाबत महाराष्ट्र शासनाकडून निर्गमीत होणा-या मार्गदर्शक सुचनांचे पालन करावे.**

**Xviii) राज्य शासनाकडून निर्गमीत झालेले आदेश / मार्गदर्शक सुचना यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. तरी त्यानुसार अनुपालन करणे बंधनकारक राहील.**

टीप :-१) वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

२) वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये, दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.

३) रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.

Scanned with CamScanner

४) कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

५) वरील सर्व नमुद अपवादात्मक व्यक्ती व आस्थापना यांना कर्तव्याखेरीज ही सवलत लागु होणार नाही.

११) नमुद सवलतीच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे **(उदा - मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

१२) सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ३१.०७.२०२० रोजी दिलेला आहे.

(संदीप बिष्णोई)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :-** ३१.०७.२०२०

Scanned with CamScanner